# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- भारत जगातली प्रमुख सागरी शक्ती म्हणून उदयाला येत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन, नौदलाच्या तीन युद्धनौकांचं जलावतरण
- ७७ व्या लष्कर दिनानिमित्त देशाचं सेनादलाला अभिवादन
- छत्रपती संभाजीनगर इथं डिजीटल इंडिया आपले सेवा केंद्र प्रकल्पाच्या जनजागृती मोबाईल व्हॅनचं उद्घाटन
- संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्याखाली अटकेत असलेल्या वाल्मिक कराड याला सात दिवसांची पोलिस कोठडी

आणि

- महिला क्रिकेटमध्ये तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचा आयर्लंडवर ३०४ धावांनी विजय, मालिका तीन – शून्य अशी जिंकली

****

भारत जगातली प्रमुख सागरी शक्ती म्हणून उदयाला येत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मुंबईत आज नौदलातल्या आयएनएस सूरत आणि आयएनएस नीलगिरी या दोन लढाऊ जहाजांचं तसंच आयएनएस वागशीर या लढाऊ पाणबुडीचं जलावतरण पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. भारताची भूमिका विस्तारवादाची नव्हे तर विकासवादाची असून, सागरी क्षेत्रात गेल्या दहा वर्षात बंदर विकास, सीमावर्ती भागांमध्ये वाढता संपर्क, भारतमाला योजना, व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम, अशा योजना राबवण्यात येत असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

***आज भारत पुरे विश्व और खासकर ग्लोबल साऊथ में एक भरोसे और जिम्मेदार साथी के रूप में पहचाना जा रहा है। भारत विस्तारवाद नही, भारत विकासवाद की भावना से काम करता है। भारत ने हमेशा ओपन, सेक्युअर, एन्क्ल्युसिव्ह और प्रॉस्परस इंडो पॅसिफिक रिजन का समर्थन किया है। हमारा एक समृद्ध इतिहास रहा है। अपने इतिहास से प्रेरणा लेते हुये आज का भारत दुनिया की एक मेजर मेरिटाईन पावर बन रहा है।***

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची सुरुवात केली, त्या शिवरायांच्या भूमीवरून नौदलाला सामर्थ्य दिलं जात असल्याचं समाधान वाटत असल्याची भावना पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केली. भारताच्या संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक सैनिकाचं त्यांनी यावेळी अभिनंदन केलं.
आपलं सरकार नौदलासह पूर्ण सैन्यदलाला आत्मनिर्भर बनवत अधिक मजबूत करण्याला प्राधान्य देत असल्याचं सांगत, यात महाराष्ट्रातल्या नियोजित वाढवण बंदराचा उल्लेख पंतप्रधानांनी केला.
संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह नौदलातले अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.
दरम्यान, नवी मुंबईत खारघर इथल्या श्री श्री राधा मदनमोहनजी या इस्कॉन मंदिराचं उद्घाटनही आज पंतप्रधानांच्या हस्ते झालं.

****

सशस्त्र दलाच्या अतुलनीय बलिदानाचा सन्मान करण्यासाठी आज लष्कर दिन साजरा केला जात आहे. याच दिवशी १९४९ मध्ये तत्कालीन जनरल के. एम. करिअप्पा यांनी शेवटच्या ब्रिटीश कमांडर इन चीफकडून भारतीय सैन्याची सूत्रं हातात घेतली होती.
राज्यात लष्कर दिनाचं मुख्य संचलन आज पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर झालं. लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मानवंदना स्वीकारली. लष्कर, पोलीस दल आणि महाराष्ट्र छात्रसेनेच्या महिला पथकाचा संचलनात सहभाग होता.

नांदेड जिल्ह्यात बिलोली तालुक्यातल्या सगरोळी इथल्या राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयात आज लष्कर दिनानिमित्त हवाई दलातल्या विमानांच्या प्रतिकृती रेडीओ कंट्रोलद्वारे उडवून चित्तथरारक कवायतींचं प्रात्याक्षिक दाखवण्यात आलं.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींच्या बदल्या केल्या आहेत. यानुसार तेलंगण उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आता मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असतील. तर मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांना दिल्ली उच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश पद मिळालं आहे.

****

निलंबित प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकरला सर्वोच्च न्यायालयानं अटकेपासून संरक्षण दिलं आहे. दिल्ली उच्च न्यायालयानं तिचा अटकपूर्व जामीन फेटाळला होता. त्यावर तिनं सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती, त्यावर सर्वोच्च न्यायालयानं आज झालेल्या सुनावणीत, तिच्याविरुद्ध कठोर पावलं उचलू नयेत, असे आदेश दिले.

****

केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या वतीनं, डिजीटल इंडिया आपले सेवा केंद्र, हा नवीन पथदर्शी प्रकल्प राज्यात सर्वप्रथम छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या प्रचारासाठी तयार करण्यात आलेल्या जनजागृती मोबाईल व्हॅनला आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आलं. या प्रकल्पात प्रत्येक ग्रामपंचायतीत एक डिजीटल इंडीया सेवा केंद्र बनवण्यात येणार असून, यात बँक ग्राहक सेवा केंद्र, आधार अद्ययावतीकरण केंद्र यांचीही सेवा उपलब्ध असेल. या प्रकल्पाबद्दल जनमानसात जागृती व्हावी यासाठी जिल्ह्यातल्या सर्व ८७० ग्रामपंचायतीत एक डिजीटल प्रचार रथ फिरणार आहे.

****

संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्याखाली अटकेत असलेल्या वाल्मिक कराड याला आज बीडच्या विशेष न्यायालयानं येत्या बावीस तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. सुरक्षेच्या कारणामुळे कराडविरुद्धचा खटला बीड इथल्या न्यायालयात वर्ग केल्यानंतर पोलिसांनी आज कराड याला केजहून बीडला आणलं आहे.

सुनावणी झाल्यावर कराड याला न्यायालयाबाहेर नेताना त्यांचे समर्थक आणि विरोधक मोठ्या संख्येनं जमा झाले होते, त्यामुळे पोलिसांना बळाचा वापर करावा लागल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पक्षाची बीड जिल्हा कार्यकारणी बरखास्त केली आहे. यापुढे तालुका अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष यांच्या चारित्र्याची पडताळणी करूनच नेमणुका कराव्या अशा सूचना बीड राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांना देण्यात आल्या आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातले आरोपी विष्णू चाटे तसंच वाल्मिक कराड यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी थेट संबंध असल्याच्या पार्श्वभूमीवर या पक्षानं हा निर्णय घेतला.

****

महिला क्रिकेट मध्ये राजकोट इथल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताने आयर्लंडचा ३०४ धावांनी पराभव केला. यासोबतच भारतीय महिलांनी तीन सामन्यांची मालिका तीन – शून्य अशी जिंकली. आज झालेल्या सामन्यात भारतीय महिलांनी प्रथम फलंदाजी करत ४३५ अशी मोठी धावसंख्या उभी केली. प्रतिका रावलनं १५४ तर कर्णधार स्मृती मंधानानं १३५ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना आयर्लंडचा डाव बत्तीसाव्या षटकांत अवघ्या १३१ धावांत संपुष्टात आला. भारताकडून दिप्ती शर्मानं तीन तर तनुजा कंवरनं दोन बळी घेतले.

****

नाशिक इथल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या हिवाळी सत्र-२०२४ च्या तिसऱ्या टप्प्यातल्या पदवी, पदव्युत्तर, तसंच विद्यापीठ संचलित अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा येत्या अठरा जानेवारी ते पंधरा फेब्रुवारीदरम्यान होणार आहेत. राज्यभरातल्या एकशे सत्त्याण्णव केंद्रांवर होणाऱ्या या परीक्षांमध्ये सुमारे नव्वद हजार विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत. यातल्या एम.बी.बी.एस. तृतीय आणि अंतिम वर्ष अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका प्रायोगिक तत्वावर ऑनलाईन पद्धतीनं परीक्षा केंद्रावर पाठवण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या सगळ्या परीक्षांचं अशा रीतीनं संपूर्ण डिजिटायझेशन करण्याचा मानस असल्याची माहिती परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात संक्रांतपर्वात बचतगटाच्या महिलांनी सैनिक कल्याणासाठी दानाचं वाण लुटलं आहे. लासूर स्टेशन, वाळूज, गंगापूर आणि पैठण इथल्या बचतगटातल्या महिलांनी सैनिक कल्याण निधीसाठी एकूण दहा हजार रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडे सोपवला. जिल्हाधिकाऱ्यांनी या महिलांच्या या दृष्टीकोनाचं आणि दातृत्वाचं कौतुक केलं आहे.

****

समृद्धी महामार्गावर पुण्याहून नागपूरकडे जाणाऱ्या लक्झरी बसची ट्रकला जोरदार धडक बसून झालेल्या अपघातात बस चालकाचा जागीच मृत्यू झाला असून पंधरा प्रवासी जखमी झाले. ही घटना आज पहाटेच्या सुमारास अमरावतीच्या जवळ असणाऱ्या धामणगाव इथल्या आष्टानजीक घडली. जखमींना धामणगाव इथल्या रुग्णालयांत दाखल करण्यात आलं आहे.

****

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात झपाट्याने झालेला बदल पाहता आपल्या कामाचा निपटारा लवकर होण्याच्या दृष्टीने तसंच शासकीय कामात पारदर्शकता यावी यासाठी तंत्रज्ञानाचा अधिक वापर करून नागरिकांनी ऑनलाईन अर्ज भरावेत, असं मत राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉक्टर किरण जाधव यांनी व्यक्त केलं आहे.

****